जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक २१४ | शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## संक्षिप्त

### पंतप्रधान मोदींची जेरूसलममधील याद वाशेम स्मारकाला भेट

**नवी दिल्ली, ता. २६ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी त्यांच्या इस्त्रायल दौऱ्यादरम्यान जेरूसलममधील याद वाशेम या जागतिक होलोकॉस्ट स्मृती केंद्राला भेट दिली. इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यासोबत त्यांनी दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीकडून मारल्या गेलेल्या ६० लाख ज्यू बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी बुक ऑफ नेम्स हॉलची पाहणी करून मानवी प्रतिष्ठेच्या रक्षणाचा संकल्प केला. यानंतर पंतप्रधान मोदींनी इस्त्रायलचे राष्ट्रपती आइझॅक हर्जोग यांची भेट घेऊन द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी स्मारक परिसरात वृक्षारोपणही केले. राष्ट्रपती हर्जोग यांनी भारत-इस्त्रायल शैक्षणिक कनेक्टिव्हिटीवर भर दिला, तर पंतप्रधान मोदींनी हर्जोग यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. नऊ वर्षांतील मोदींचा हा दुसरा इस्त्रायल दौरा उभय देशांतील धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करणारा ठरणार असल्याचे सांगितले जातेय.

# पूर्व हवेलीतील जमिनींना सोन्याचे मोल

## महामार्गांच्या जाळ्यामुळे गुंतवणूकदारांची चांदी; जागेच्या किमती गगनाला भिडल्या

हनुमंत चिकणे

उरुळी कांचन, ता. २६ : पुणे - सोलापूर महामार्गावर लांबच लांब लांब रांगा लागत असल्याने महामार्ग २४ तास हाऊसफुल्ल होऊन धावतोय. पुणे सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने या मार्गावरील हडपसर ते यवत या दरम्यान सहा पदरी उन्नत मार्गांबरोबरच अस्तित्वातील रस्ता सहा पदरी करण्यात येणार आहे. बांधा-वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर या रस्त्याची कामे होणार असून, त्यासाठी ५ हजार २६२.३६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या संबंधीचा शासननिर्णय सार्वजनिक बांधकाम विग्गाच्या उपसचिवांनी नुकताच काढला.

यामुळे भविष्यात पुणे सोलापूर महामार्गासह पुणे -नगर, पुणे - सातारा, हडपसर - सासवड या चारही दिशेने वाहणारे महामार्ग सोन्याचे अंडे देणारी कोंबडी ठरेल...या भावनेने महामार्गालगतच्या जमिनींना सोन्याचे दर आले आहेत. विकणारा वाटेल तो दर सांगतोय आणि घेणारा त्या दराने घेत असल्याची उदाहरणे सध्या



पहायला मिळत आहेत. त्यातच पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या ३ हजार एकर जमिनीसाठी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या चारही मार्गांच्या शेजारील जमिनींना सोन्याचे दिवस आले आहेत.

सध्या पूर्व हवेलीतील हडपसर, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, व उरुळी कांचनपासून यवत पर्यत एकच समस्या भेडसावते, ती म्हणजे वाहतूक कोंडीची, अशा परिस्थितीत सर्वसामान्यांचे जीवनमान कोंडीत अडकले आहे. सर्वाधिक फटका पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती व हडपसर शहराला बसत असून वाहनधारक अक्षरशः कॉलनी भागातून रस्ते शोधत बाहेर पडण्याचा प्रयत्न करताहेत. अशात मात्र काही गुंतवणूकदार भविष्याची आशा म्हणून या कोंडीकडे पाहत आहेत.

पुणे -सोलापूर या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र सरकारने ५ हजार कोटीचा निधी नियोजित केल्याचे सांगितले जाते. त्यातच शहरात रिंगरोड मंजूर असून या शक्यतेने देखील भांडवलदारांकडून आत्ताच जमिनीकडे अधिकच ओढा वाढला आहे. तसेच कदमवाकवस्ती येथे एका बड्या नामांकित बांधकाम व्यावसायिकाने येथील औद्योगिक वसाहत कार्यान्वित होऊ शकते हा विचार करून महामार्गाच्या कडेच्या जमिनीला सोन्याचे दर आले आहेत. तसेच मोठी गृहसोसायट्यांची निर्मिती युध्द पातळीवर सुरु आहे.

दरम्यान, महामार्गाचे रुंदीकरण प्रस्तावित असून त्यादरम्यान शहराच्या वाहतूक कोंडीवर कायमचा पर्याय शोधण्यासाठी रिंगरोड करण्याची मागणी होत आहे. रिंगरोड मंजूर असून काही ठिकाणी कामे सुरु झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे शहराच्या चारही बाजूने अनेक जमिनी अधिग्रहीत होणार असल्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांची धास्ती वाढली आहे. त्यामुळे या भागात जमिनी घेण्यालाही गुंतवणूकदार प्राधान्य देताना दिसत आहे.

### उद्योग-व्यावसायिकांकडून मागणी

जमिनींना मागणी वाढू लागल्याने अक्षरशः सोन्याचे दर मिळू लागले आहेत. व्यापारी, गुंतवणूकदार आणि उद्योगसमूहांचा वाढता कल लक्षात घेता भोवतीचा पट्टा नव्या व्यावसायिक नकाशावर झळकू लागल्याचे चित्र आहे. कदम वाकवस्ती, लोणी काळभोर, उरुळी कांचन व परिसरात महामार्गालगत पेट्रोलपंप, ट्रान्सपोर्ट कार्यालये, गोदामे, लॉजिस्टिक पार्क, ढाबे, हॉटेल्स तसेच लहान- मोठ्या उद्योगांसाठी जागेची मागणी झपाट्याने वाढत आहे.

पूर्व हवेलीत होणाऱ्या रिंगरोडमुळे दळणवळणाची सुविधा हि सोपी होईल, पुण्याचे अंतर सहजासहजी कमी होऊन लगेच जाता येणार आहे. टाऊनशिप व रहिवास यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राहण्यासाठी व उद्योग धंद्यासाठी या ठिकाणी आकर्षित होतील. रेल्वे, पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ, भविष्याकाळात सर्वात जास्त नागरी वसाहत म्हणून या भागाला होईल. त्यामुळे परिसरातील जमिनींना सोन्याचा भाव येणार आहे. रिंगरोडमुळे वेगवेगळे झोन पडणार असून यामुळे जमिनींना सोन्याचे दिवस आले आहेत.
- **संतोष कांचन,** माजी सरपंच, उरुळी कांचन, ता. हवेली

पूर्व हवेलीत जमिनींसाठी मागणी इतकी झपाट्याने वाढली आहे की, जवळजवळ सोन्याचे दर लागू होऊ लागले आहेत. उरुळी कांचन रेल्वे स्थानकाचे विस्तारीकरण, पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळ यामुळे व्यापारी, गुंतवणूकदार आणि उद्योगसमूहांचा कल पाहता, भोवतीचा पट्टा आता नव्या व्यावसायिक नकाशावर चमकूलागला आहे. ट्रान्सपोर्ट कार्यालये, गोदामे, लॉजिस्टिक पार्क, ढाबे, हॉटेल्स तसेच लहान-मोठ्या उद्योगांसाठी जागेची मागणी झपाट्याने वाढत आहे. यामुळे परिसरात व्यावसायिक क्रांतीची लाट सुरू झाली आहे. स्थानिक अर्थव्यवस्था, रोजगार आणि सेवा क्षेत्राला यामुळे नवसंजीवनी मिळू लागली आहे.
- **सागर आबा कांचन / संदीप गव्हाणे,** उद्योजक, तथा जानाई डेव्हलपर्सचे संचालक, उरुळी कांचन, ता. हवेली

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड; प्रफुल्ल पटेल यांची घोषणा

**मुंबई, ता. २६ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मुंबईतल्या वरळी डोम येथे राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत राष्ट्रीय सरचिटणीस प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली.

गुरुवारी (ता. २६) मुंबईतल्या वरळी डोम येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीमध्ये सर्वानुमते सुनेत्रा अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रफुल्ल पटेल यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली.



त्यानंतर पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत सुनेत्रा पावारांच्या खंबीर नेतृत्वाचं कौतुक केलं.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर अपघात झाला. या अपघातामध्ये त्यांचं दुर्दैवी निधन झालं. त्यानंतर ३१ जानेवारी रोजी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार? याची चर्चा मागच्या महिन्याभरापासून सुरु होती. अखेर गुरुवारी सुनेत्रा पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदावर विराजमान झाल्या आहेत.

**नव्या पर्वाची सुरुवात**

सुनेत्रा पवार यांनी यापूर्वीच उपमुख्यमंत्री म्हणून प्रशासकीय जबाबदारी स्वीकारली आहे. आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आल्याने, राष्ट्रवादी काँग्रेसमधील त्यांचे स्थान अधिक भक्कम झाले आहे. आगामी निवडणुका आणि राजकीय पेचप्रसंग हाताळताना सुनेत्रा पवार कशा प्रकारे नेतृत्व करतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अजित दादांचा वारसा पुढे नेत असतानाच, पक्ष संघटनेला अधिक बळकट करण्याचे मोठे आव्हान आता सुनेत्रा पवार यांच्यासमोर असणार आहे.

# वाघोलीत महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा भव्य प्रारंभ; मुरलीधर मोहोळ राहणार उपस्थित

## आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांची माहिती

**वाघोली, ता. २६ :** महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा मानबिंदू असलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी २०२५ -२६ स्पर्धेचा पवित्र प्रारंभ वासापूजन व मातीपूजन सोहळ्याने होणार आहे. हा भव्य कार्यक्रम सोमवारी (ता. ०२) सकाळी दहा वाजता बाजारतळ मैदान, वाघोली (ता. हवेली) येथे संपन्न होणार आहे. अशी माहिती आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने आणि रामकृष्ण सातव पाटील यांच्या आयोजनातून ही प्रतिष्ठेची स्पर्धा रंगणार आहे. वाघोली येथे प्रथमच एवढ्या भव्य स्वरूपात महाराष्ट्र केसरी स्पर्धे चे आयोजन होत असल्याने ग्राम स्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



कुस्ती परंपरेचा सन्मान राखत आणि महाराष्ट्राच्या मातीचा गौरव वाढवत स्पर्धेची दिमाखदार सुरुवात केली जाणार आहे.

या शुभारंभ सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री सहकार व नागरी हवाई वाहतूक मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत पारंपरिक विधींसह स्पर्धेच्या पूर्वतयारीचा शुभारंभ होणार आहे. आयोजक समितीने सर्व मान्यवर पत्रकार बंधू-भगिनींना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे आणि स्पर्धेच्या परंपरेचा गौरव जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले आहे. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल माध्यमांमध्ये या सोहळ्याला व्यापक प्रसिद्धी द्यावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

दरम्यान, ६८ वी महाराष्ट्र केसरी २०२५ -२६ स्पर्धा समिती, समस्त ग्रामस्थ वाघोली व पंचक्रोशी यांच्या वतीने सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# विरोधी पक्ष हा गोंधळलेल्या अवस्थेत : देवेंद्र फडणवीस यांची टीका

**मुंबई, ता. २६ :** दावोसमध्ये भारतीय कंपन्यांसोबत सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यावरून झालेल्या टीकेचे खंडन करत, आर्थिक जगात प्रासंगिक राहण्यासाठी उपस्थिती आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच विरोधी पक्ष हे गोंधळलेले आहेत, असे म्हणत विरोधकांवर टीका केली. विधिमंडळात राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेवेळी फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील विविध मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली.

फडणवीस यांनी म्हटले की, सरकारच्या विकसित महाराष्ट्र दस्तऐवजात पुढील चार ते पाच वर्षांत राज्याला एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचा रोडमॅप आणि दृष्टिकोन मांडण्यात आला आहे. विरोधी पक्ष तथ्य नसलेल्या आधारे सरकारला



लक्ष्य करत आहेत. ते गोंधळलेले आहेत. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत भारतीय कंपन्यांसोबत सामंजस्य करारांवर झालेल्या टीकेवर बोलताना ते म्हणाले की, जर आर्थिक जगात प्रासंगिक राहायचे असेल तर दावोसमध्ये उपस्थिती आवश्यक आहे, म्हणून मी तेथे राज्याचे प्रतिनिधित्व केले. या ठिकाणी गेल्या काही वर्षांत आम्ही महाराष्ट्राबद्दल चांगली चर्चा निर्माण करण्यात यशस्वी झालो आहोत. २०२४ मध्ये स्वाक्षरी केलेल्या ७० टक्के करारांची आणि २०२५ मध्ये स्वाक्षरी केलेल्या ८८ टक्के करारांची अंमलबजावणी सुरू आहे. राष्ट्रीय पातळीवरील ३५ टक्के सामंजस्य करार हे गुंतवणुकीत रूपांतरित होतात, परंतु महाराष्ट्रात हे प्रमाण ५५ टक्के असल्याचा दावा त्यांनी केला. दावोसमध्ये स्वाक्षरी झालेल्या ७५ टक्क्यांहून अधिक सामंजस्य करारांचे गुंतवणुकीत रूपांतर झाले असल्याचे ते म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना १५ हजार ४७२ कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे आणि योग्य वेळी कर्जमाफीही केली जाईल. आम्ही शेतकऱ्यांचे डिजिटल रेकॉर्ड तयार करत आहोत जेणेकरून फक्त गरजूंनाच कर्जमाफी मिळेल. आम्ही २३ हजार कोटी रुपयांचे वीज बिल माफ केले आहे आणि तीन वर्षांत त्यांना १० लाखांहून अधिक कृषी पंप देण्यात आले आहेत.

# कदमवाकवस्तीत एमजीपी लाईनवरून सत्ताधाऱ्यांच्या खाजगी पाईपलाईन?

## प्रशासनाने तात्काळ चौकशी करावी : प्रतिक काळभोर यांची मागणी

**लोणी काळभोर, ता. २६ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथे पाणीपुरवठा योजनेवरून वाद निर्माण झाला असून एमजीपीच्या अधिकृत लाईनमधून सत्ताधारी गटाशी संबंधित दोन जणांच्या खाजगी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करावी. आणि संबंधित दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी प्रतिक काळभोर यांनी केली आहे.

पांडवदंड रस्त्यावर एम जीपीच्या मुख्य लाईनमधून दोन खाजगी पाईपलाईन नेण्याचे काम सुरू असल्याच्या वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. कवडी माळवाडी परिसरात पाण्याचा तीव्र तुटवडा असताना अधिकृत एमजीपीचे काम बंद आहे; मात्र दोन वैयक्तिक पाईपलाईनचे काम सुरू असल्याने संशय व्यक्त केला जात आहे. हे काम कोणाच्या परवानगीने सुरू आहे? एमजीपीने आजपर्यंत कारवाई का केली नाही? यामागे संगनमत तर नाही ना? असा सवाल प्रतिक काळभोर यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना प्रतिक काळभोर म्हणाले की, एमजीपीच्या लाईनम धूनच या दोन पाईपलाईन पुढे नेल्या जात असून भविष्यात या माध्यमातून पाण्याची विक्री करण्याचा डाव असू शकतो. हे पाणी फक्त दोन घरांसाठी आहे का? मग संपूर्ण गावाला पाण्याशिवाय ठेवणार का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सत्तेचा गैरवापर करून अनधिकृत कामे सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आम्ही कोणत्याही संगनमतात नाही; केवळ चुकीच्या कामांना विरोध करतो. जल जीवन मिशनच्या विकास आराखड्यानुसार पारदर्शक पद्धतीने कामे व्हावीत, ही आमची अपेक्षा आहे, असे सांगत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रतिक काळभोर यांनी केली.

कदमवाकवस्तीचे माजी उपसरपंच ऋषिकेश काळभोर यांनी सांगितले की, पूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत संबंधित पाईपलाईन कोणाची आहे, याची माहिती देण्यात आली होती आणि तेव्हा काम थांबवण्यात आले होते. मात्र अचानक हे काम पुन्हा सुरू करण्यात आले. आम्ही तत्काळ घटनास्थळी जाऊन काम बंद पाडले. कवडी माळवाडीला पाणी नाही आणि खाजगी पाईपलाईन टाकून भविष्यात पाणी विक्रीचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप त्यांनी केला. काम कायमस्वरूपी बंद न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, प्रीतम गायकवाड यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, माझ्या शेतीसाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू होते. काही जणांनी आक्षेप घेतल्याने आम्ही काम तात्पुरते थांबवले आहे. गावातील राजकारणामुळे हा वाद निर्माण झाला असून आमचा कोणाशीही वाद घालण्याचा हेतू नाही.

पाणीपुरवठा योजनेचे काम जवळपास ७० टक्के पूर्ण झालेले असताना काही जण मुद्दाम ही योजना बंद पाडण्याचा डाव आखत आहेत. गावकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर राजकारण करणे अत्यंत निंदनीय आहे. योजनेमध्ये कुठेही चुकीचे काम झाले असेल तर संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी; मात्र जर कोणी जाणूनबुजून शासकीय योजना अडवण्याचा प्रयत्न करत असेल, शिवरस्त्यावरून माळवाडीला पाईपलाईन नेण्यास जे अडथळे निर्माण करतील त्यांच्यावरही प्रशासनाने कठोर कारवाई करावी. तसेच प्रशासनाने वेळ न दवडता ही योजना तातडीने पूर्ण करावी आणि मायबाप जनतेचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा.
- **चित्तरंजन गायकवाड,** (माजी सरपंच, कदमवाकवस्ती, ता. हवेली)

## संक्षिप्त

### तळेगाव चौक येथे पैसे न दिल्याने रिक्षाचालकावर हल्ला

**पिंपरी, ता. २६ :** चाकणमधील तळेगाव चौक परिसरात एका रिक्षाचालकावर आणि त्याच्या भावावर दगडाने खुनी हल्ला करण्यात आला. ही घटना सोमवारी (२३फेब्रुवारी) रात्री सात वाजण्याच्या सुमारास येवले चहा जवळ घडली. या प्रकरणात योगेश मधुकर मुंगडे (२०, नाणेकरवाडी, चाकण) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी नामदेव प्रकाश नाईक (२४, भुजबळ आळी, चाकण), लोकेश विलास खंडाळे (२७, कोंढवा, चाकण) आणि दिनेश विलास खंडाळे (२५, कोंढवा, चाकण) या तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश आणि त्यांचा भाऊ चहाच्या टपरी समोर उभे असताना आरोपींनी तिथे येऊन त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी दोघांना लाथाबुक्यांनी आणि दगडाने मारहाण केली. यात फिर्यादी यांच्या भावाच्या तोंडाला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर आरोपींनी योगेश यांना तुझा मर्डरच करतो अशी धमकी देत मोठा दगड उचलून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

### चिंचवड येथे प्लॉट आणि व्यवसायाचे आमिष दाखवून २५ लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. २६ :** चिंचवड परिसरात नवीन व्यवसाय सुरू करून देण्याचे आणि स्वस्त दरात प्लॉट देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची आणि तिच्या पतीची २५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना महात्मा फुलेनगर येथे घडली. या प्रकरणी महिलेने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचे वडील आणि भाऊ असलेल्या आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या पतीचा विश्वास संपादन केला. त्यांनी नवीन व्यवसाय व पतसंस्था टाकण्याचे आश्वासन दिले, तसेच २५ लाख रुपये भरल्यास एक गुंठा प्लॉट मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून फिर्यादीच्या पतीने वेळोवेळी लाख रुपये आणि भावाच्या खात्यात २ लाख रुपये ऑनलाईन असे एकूण २५ लाख रुपये ऑनलाइन जमा केले. मात्र, पैसे घेऊनही आरोपींनी कोणताही व्यवसाय सुरू करून दिला नाही किंवा प्लॉट नावावर केला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसांत धाव घेतली.

### मुलीला कॉलेजमध्ये प्रवेश देण्याच्या बहाण्याने साडेपाच लाखांना गंडा

**पुणे, ता. २६ :** मुलीला कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली ५ लाख ४५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना ६ एप्रिल २०२४ ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडली. या प्रकरणात ४६ वर्षीय व्यक्तीने दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार कर्नाटक येथील एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्या मुलीला कॉलेजमध्ये डमिशन मिळवून देतो असे सांगितले. त्यासाठी त्याने फिर्यादीकडून आरटीजीएस, ऑनलाइन आणि रोख स्वरूपात एकूण ५ लाख ४५ हजार रुपये घेतले. मात्र, पैसे घेऊनही मुलीला प्रवेश मिळवून दिला नाही. फिर्यादीने जेव्हा आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळ करत त्यांना शिवीगाळ केली.

### फर्निचरच्या कामाचा जाब विचारल्याने दुकानदाराचे नाक फोडले

**पिंपरी, ता. २६ :** काळेवाडी परिसरात फर्निचरचे काम अपूर्ण का ठेवले असे विचारल्याच्या रागातून एका व्यावसायिकाला बेदम मारहाण करून त्याचे नाक फोडण्यात आले. ही घटना सोमवारी विजयनगर येथे घडली. या प्रकरणी बजरंगलाल श्रीनिवास बंग (३५, रिचमंड पार्क, रहाटणी) यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सलीम मुसा पंजेशा (४४, नढे नगर, काळेवाडी) याला अटक केली असून त्याचा मुलगा आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बंग हे त्यांच्या मित्राच्या फर्निचरच्या कामाबाबत विचारपूस करण्यासाठी आरोपीच्या दुकानात गेले होते. काम पूर्ण का केले नाही, असा जाब विचारल्यामुळे आरोपी चिडला. त्याने बंग यांच्या नाकावर जोरात बुक्का मारला, ज्यामध्ये त्यांच्या नाकाचे हाड फॅक्चर झाले. तसेच आरोपी आणि त्याच्या साथीदारांनी बंग यांना लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली.

### स्टॉक मार्केटमधील गुंतवणुकीच्या बहाण्याने १४ लाखांची फसवणूक

**चिंचवड, ता. २६ :** पिंपळे सौदागर येथील एका व्यक्तीला स्टॉक मार्केटमध्ये जास्तीचा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून १४ लाख २९ हजार रुपयांना गंडवण्यात आले. ही घटना ९ ऑगस्ट २०२५ ते ४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन माध्यमातून घडली. याबाबत ३७ वर्षीय व्यक्तीने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना एका व्हॉट्सप ग्रुपमध्ये अॅड करून एक प डाऊनलोड करण्यास भाग पाडले. आरोपींनी स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा होईल असे आमिष दाखवले. त्यांच्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने वेळोवेळी एकूण १४ लाख २९ हजार ९० रुपये गुंतवले. मात्र, गुंतवणूक केल्यानंतर त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही आणि त्यांची मुद्दल रक्कमही परत मिळाली नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार केली.

# व्हीएसआर कंपनीच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल व्हावा; रोहित पवार यांची मागणी

**बारामती, ता. २६ :** दोन दिवसांपूर्वी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या २४ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अहवालाचा आधार घेत आम्ही एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली. बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पदाधिकारी आणि समर्थकांसह ते मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गेले होते. मात्र, काहींनी मुंबईत एफआयआर दाखल करता येणार नाही अशी हरकत घेतल्याने तक्रार स्वीकारली गेली नाही. झिरो एफआयआर संकल्पनेनुसार मुंबईत तक्रार नोंदवता येऊ शकते, तरीही ती नाकारण्यात आल्याचा आरोप करत आज ते बारामती पोलीस ठाण्यात आले.

रोहित पवार म्हणाले की, डीजीसीएच्या अहवालात व्हीएसआर विमान कंपनीवर ठपका ठेवण्यात आला



असून त्याच आधारे एफआयआरची मागणी केली जात आहे. दादा ज्या लेअर जेट प्रकारातील विमानाने बारामतीला गेले, ते नॉन-कम्प्लायन्समध्ये होते. कंपनीने ही बाब मान्यही केली आहे. मग अशा स्थितीत अजित दादांना तेच विमान का देण्यात आले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणात निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल व्हावा, अशी त्यांची मागणी आहे.

डीजीसीएच्या २४ फेब्रुवारीच्या आदेशानुसार व्हीएसआरची पाचही विमाने ग्राऊंड करण्यात आली आणि त्यांच्या उड्डाणावर बंदी घालण्यात आली. पाचही विमाने ग्राऊंड केली असताना अजित पवारांना संबंधित विमान कसे देण्यात आले? ही चूक होती की मुद्दाम केलेली कृती? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच, अजित पवारांचे विमान सुरक्षित असल्याचा अहवाल कोणी तयार केला आणि त्यावर सह्या कोणी केल्या? याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. विमान उड्डाणास सक्षम आहे की नाही, हवामानाची दृश्यमानता योग्य आहे की नाही, यासह इतर सर्व तांत्रिक बाबींची जबाबदारी Arrow नावाच्या कंपनीकडे असल्याचे त्यांनी सांगितले. एका व्हॉट्सअॅप चॅटनुसार पवार नावाच्या व्यक्तीने हवामान योग्य असल्याचे कळवले आणि त्यानंतर अजित दादांच्या पीएने त्यांना माहिती दिल्यावर ते कारमधून विमानात गेले, असा दावा रोहित पवार यांनी केला. संबंधित कंपनीवर कारवाई व्हावी, अशीही त्यांची भूमिका आहे.

पोलिसांनी ॲक्सिडेंट रिपोर्ट नोंदवला असल्यामुळे एफआयआर करता येणार नाही असे सांगितल्याचा दावा करत रोहित पवार यांनी नाराजी व्यक्त केली. अपघाताचा केवळ अहवाल झाला आहे; मात्र गुन्हेगारी दृष्टीकोनातून तपास का होत नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कबुतरांची चोरी झाली तरी एफआयआर होतो, मग या अपघाताबाबत का नाही? असा टोला त्यांनी लगावला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रत्येक नागरिकाला एफआयआर दाखल करण्याचा अधिकार आहे, असे सांगत आमचा हक्क का नाकारला जातोय? असा उद्विग्न सवाल त्यांनी केला. विमानासंदर्भातील माहिती असलेले व्हॉट्सअॅप चॅट यापूर्वीच सादर केल्याचे सांगत, त्या गटात काही वरिष्ठ अधिकारी होते आणि त्यांच्या दुर्लक्षामुळेच हा अपघात घडला असावा, असा आरोप त्यांनी केला. संबंधितांवर कारवाई व्हावी आणि योग्य गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी त्यांनी माध्यमांशी बोलताना पुन्हा एकदा ठामपणे मांडली.

### पिंपरीत वीस रुपयांवरून चाकू हल्ला

**पिंपरी, ता. २६ :** वीस रुपये देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एकावर चाकूने जीवघेणा हल्ला केला. ही घटना मंगळवारी (२४ फेब्रुवारी) रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. या हल्ल्यात जखमी झालेल्या ३८ युवकाने याबाबत पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पिंपरी येथे गेले असता आरोपीने त्यांच्याकडे २० रुपये मागितले. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपी संतापला. आरोपीने खिशातील चाकू काढून फिर्यादीच्या गळ्यावर आणि मानेला वार केला. तसेच उपस्थित नागरिकांना चाकू दाखवत धमकावत दहशत माजवली. तुम्हा सर्वांना खल्लास करीन अशी धमकी देत आरोपीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.

## खासदार संजय राऊतांची निर्दोष मुक्तता; सत्र न्यायालयाचा निकाल

**मुंबई, ता. २६ :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मीरा भाईंदर शौचालय घोटाळ्याबाबत आरोप असल्याप्रकरणी सत्र न्यायालयाने निकाल देत त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

किरीट सोमय्या यांची पत्नी मेधा सोमय्या यांच्या मानहानी प्रकरणी संजय राऊत यांना माझगाव कोर्टाने शिक्षा सुनावली होती. त्यांना माझगाव कोर्टाने २५ हजारांचा दंड आणि १५ दिवसांची कैद अशी ही शिक्षा होती. या शिक्षेला संजय राऊत यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले होते. या आव्हानानंतर गेल्या अनेक दिवसांपासून युक्तीवाद सुरु आहे. अखेर न्यायालयाने संजय राऊत यांची या प्रकरणी निर्दोष मुक्तता



केली आहे. किरीट सोमय्या यांची पत्नी मेधा सोमय्या यांच्या मानहानी प्रकरणी संजय राऊत यांना माझगाव कोर्टाने शिक्षा सुनावली होती. त्यांना माझगाव कोर्टाने २५ हजारांचा दंड आणि १५ दिवसांची कैद अशी ही शिक्षा होती. या शिक्षेला संजय राऊत यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले होते. या आव्हानानंतर गेल्या अनेक दिवसांपासून युक्तीवाद सुरु आहे. अखेर न्यायालयाने संजय राऊत) यांची या प्रकरणी निर्दोष मुक्तता केली आहे.

मीरा रोड येथील शौचालय घोटाळ्याचे हे प्रकरण होतं. संजय राऊत यांनी किरीट सोमय्या यांची पत्नी मेधा सोमय्या यांच्यावर शौचालय घोटाळ्याचे आरोप केले होते. या आरोपांनंतर मेधा सोमय्या यांनी संजय राऊत यांच्याविरूद्ध मानहानीचा दावा दाखल केला होता. या प्रकरणी खालच्या माजगाव कोर्टात सुनावणी होऊन संजय राऊत यांना दोषी ठरवण्यात आलं होतं. त्यानंतर न्यायालयानं संजय राऊत यांना १५ दिवसाची तुरूंगवासाची शिक्षा सुनावली होती. त्याचबरोबर संजय राऊत यांना दंडही ठोठावण्यात आला होता. दरम्यान, या निकालाविरूद्ध संजय राऊत यांनी सत्र न्यायालयात धाव घेतली होती. त्यावेळी सत्र न्यायालयानं संजय राऊत यांच्या शिक्षेला स्थगिती दिली होती. त्यानंतर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयानं संजय राऊत यांची निर्दोष मुक्तता करत त्यांना दिलासा दिला आहे

### राज्यातील ८४ टक्के शाळा मराठी माध्यमाच्या : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, ता. २६ :** राज्यात दोन हजार मराठी शाळा बंद पडल्याच्या विरोधकांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आकडेवारीच्या आधारे उत्तर दिले. राज्यातील ८४ टक्के शाळा मराठी माध्यमाच्या असून ६९ टक्के विद्यार्थी मराठी माध्यमातून शिक्षण घेत आहेत, अशी माहिती त्यांनी सादर केली. मराठी शाळा बंद होत असल्याबाबतची माहिती पूर्णपणे कपोलकल्पित असल्याचा दावाही त्यांनी केला.

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी विरोधकांना थेट सवाल केला. दोन हजार मराठी शाळा बंद पडल्याचा आरोप वारंवार केला जातो, पण असा आत्मविश्वास येतो कुठून, असे विचारत त्यांनी या आकडेवारीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मराठी शाळांबाबत केवळ भावना व्यक्त करून उपयोग नसून ठोस कृतीची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

नवीन शैक्षणिक धोरण आणि मातृभाषेतील उच्च शिक्षण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवीन शैक्षणिक धोरणाचा उल्लेख करत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, अभियांत्रिकीसह उच्च शिक्षण आता मातृभाषेत घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मराठी शाळांचे अस्तित्व टिकवत असतानाच विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञानही आत्मसात करणे तेवढेच आवश्यक असल्याचे नमूद करत मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांचा समतोल शिक्षणात महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबई सेंट्रलजवळील पुलाचे लोकार्पण; पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर असे होणार नामकरण

**मुंबई, ता. २६ :** विकासकामांमध्ये गुणवत्ता आणि वेग या दोन्ही गोष्टींना राज्य शासनाचे प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाजवळील १३० वर्षे जुन्या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम नियोजित मुदतीपेक्षा चार महिने आधी, अवघ्या १५ महिन्यांत पूर्ण केल्याबद्दल त्यांनी बृहमुंबाई महानगर पालिकेचे अभिनंदन केले.

पुलाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, दत्तात्रय भरणे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अमिन पटेल, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय



घाडी, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर आणि महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या पुलाची मुदत संपली होती. त्यामुळे सुरक्षितता लक्षात घेऊन त्याची तातडीने पुनर्बांधणी करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने काटेकोर नियोजन करून हे काम मुदतीआधी पूर्ण केले, ही प्रशंसनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईत सध्या आणखी सहा पूल अंतिम टप्प्यात असून येत्या दोन-तीन महिन्यांत त्यांचेही लोकार्पण होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या पुलाचे नामकरण पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर असे करण्यात येणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. अहिल्याबाई होळकर यांनी आदर्श प्रशासन, प्रजाहितदक्ष राज्यकारभार, धर्मपरायणता आणि सामाजिक बांधिलकी यांचा उत्तम नमुना घालून दिला. त्यांनी उभारलेली मंदिरे, घाट, उद्योग आणि महिलांसाठी घेतलेले उपक्रम आजही प्रेरणादायी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

### मैत्रिणीशी बोलण्याच्या कारणावरून तरुणाला टोळक्याकडून मारहाण

**पुणे, ता. २६ :** पुणे शहरातील पौड फाटा परिसरात मैत्रिणीशी बोलण्याच्या कारणावरून २१ वर्षीय तरुणावर टोळक्याने मध्यरात्री हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास मेगासिटी रोड येथे हा प्रकार घडला.

या प्रकरणी जखमी तरुणाने कोथरूड पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी वाकडेवाडी परिसरात नोकरी करत असून, काही दिवसांपूर्वी पत्रकारनगर भागात आरोपींपैकी एकाने तू माझ्या मैत्रिणीशी का बोलतोस? असा जाब विचारत वाद घातला होता. ओळखीचे असल्याने त्यावेळी तक्रार देण्यात आली नव्हती.

मात्र २४ फेब्रुवारीच्या रात्री फिर्यादी आपल्या मित्रासोबत रस्त्यावर उभे असताना तिन्ही गाड्यांतून आरोपी तेथे आले. बोलण्याच्या बहाण्याने बाजूला येण्यास सांगितले. फिर्यादीने नकार दिल्यानंतर शिवीगाळ सुरू झाली आणि त्यानंतर लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. एका आरोपीने धारदार हत्याराने वार केल्याचा आरोप असून, बचाव करताना फिर्यादीच्या हाताला व डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना वाचवण्यासाठी पुढे आलेल्या मित्रालाही मारहाण करण्यात आली.

जखमी अवस्थेत फिर्यादीने ससून सर्वोपचार रुग्णालय येथे उपचार घेतल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी तसेच आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न देण्याची विधानपरिषदेत मागणी

**मुंबई, ता. २६ :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न प्रदान करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरताना दिसत आहे. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने विधानपरिषदेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

भाजप आमदार प्रसाद लाड यांनी सावरकरांना मरणोत्तर भारतरत्न देण्यासाठी ठराव संमत करावा आणि तो केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी मागणी सभागृहात केली. देशात आणि राज्यात सध्या भाजपाचे सरकार असून सावरकरांच्या विचारांशी वैचारिक जवळीक असतानाही त्यांना अद्याप सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेला नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

यासंदर्भात संसदीय कामकाजमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. ठराव सभापतींकडे मांडून पुढील निर्णय



घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शासनाने औपचारिक प्रस्ताव आणणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. सावरकरांना भारतरत्न देण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे.

मात्र २०१९ मधील संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकारने स्पष्ट केले होते की, भारतरत्न पुरस्कारासाठी औपचारिक शिफारसीची आवश्यकता नसते. योग्य वेळी निर्णय घेतला जाईल, असे केंद्रीय गृहमंत्रालयाने त्यावेळी नमूद केले होते. महाराष्ट्र विधानपरिषदेतून आता ठराव पुढे सरकल्यास सावरकरांच्या भारतरत्न प्रश्नावर नव्याने राजकीय चर्चा रंगण्याची शक्यता आहे.

## उजनी पाणलोट क्षेत्रातील धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या अतिक्रमण हटाव नोटीसा रद्द कराव्यात

### दत्तात्रय भरणे व हर्षवर्धन पाटील यांचा संयुक्त पुढाकार

सागर जगदाळे

भिगवण, ता. २६ : उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील धरणग्रस्त शेतकऱ्यांना भिमा उपसा सिंचन विभागाकडून पाठविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव नोटीसा तात्काळ रद्द कराव्यात, अशी ठाम मागणी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुंबईत भेट घेऊन बुधवारी (दि. २५) केली.

उजनी धरण उभारणीसाठी इंदापूर, करमाळा, माढा, दौंड आणि कर्जत तालुक्यातील तब्बल ८१ गावांनी आपली जमीन दिली. हजारो शेतकऱ्यांनी जनहितासाठी नाममात्र मोबदल्यात मालमत्ता शासनाकडे सुपूर्द केली. मात्र,



अनेक धरणग्रस्तांचे आजतागायत योग्य पुनर्वसन झालेले नाही. मूलभूत नागरी सुविधांपासूनही अनेक गावे वंचित आहेत. १७ जून २०१९ आणि ८ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार धरण क्षेत्रालगतच्या अतिरिक्त जमिनी ४९ वर्षांच्या पी.पी.पी. (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) करारावर देण्याचा प्रस्ताव आहे. या निर्णयास धरणग्रस्तांचा तीव्र विरोध आहे. शेतकऱ्यांनी संपादित झालेल्या पण प्रत्यक्षात पाण्याखाली न गेलेल्या जमिनींवर पाणीपातळी घटल्यानंतर गाळपेरामध्ये जनावरांसाठी चारा पिके घेतली आहेत. अशा जमिनी काढून घेण्यास धरणग्रस्तांचा ठाम विरोध असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

१० ऑक्टोबर १९७३ व १९ ऑक्टोबर १९७४ च्या महसूल व वनविभागाच्या शासन निर्णयानुसार संपादित परंतु उपयोगात न आलेली जमीन मूळ मालकांना परत देणे किंवा भाडेकराराने देणे, असे धोरण होते. मात्र, नव्या शासन निर्णयात या धोरणाशी विसंगती दिसून येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मूळ मालकांना जमीन परत देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी दत्तात्रय भरणे व हर्षवर्धन पाटील यांनी केली. यावर सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

#### पुण्यात लवकरच संयुक्त बैठक

या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यासाठी पुण्यात उजनी धरणग्रस्त बचाव कृती समितीचे पदाधिकारी व शेतकरी यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित करण्याची विनंतीही करण्यात आली आहे. त्यानुसार लवकरच पुण्यात बैठक होणार असल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

# सिंहगडावर कामाला आलेल्या मजुराचा दरीत सापडला मृतदेह

**विशाल शिंदे**

राजगड, ता. २६ : ऐतिहासिक सिंहगड किल्ल्यावर कामासाठी आलेल्या एका मजुराचा मृतदेह कल्याण दरवाजा परिसरातील खोल दरीत आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दशरथ शंकर धोत्रे (वय ५३, रा. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे समाधी परिसरात काम करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, धोत्रे हे चार दिवसांपूर्वीच इतर ४-५ सहकाऱ्यांसोबत कामासाठी गडावर आले होते. ते गडावरच मुक्कामाला होते. मात्र, बुधवारी मध्यरात्रीपासून ते अचानक बेपत्ता झाले. सुरुवातीला ते आपल्या गावी गेले असावेत, असा अंदाज सहकाऱ्यांनी वर्तवल्याने



त्यांचा शोध कोणी घेतला नाही. मात्र, दिवसभर त्यांच्याशी संपर्क न झाल्याने संशय बळावला. सायंकाळच्या सुमारास काही पर्यटकांना कल्याण दरवाजा परिसरातील दरीत एक मृतदेह दिसून आला, त्यानंतर ही धक्कादायक घटना उघडकीस आली.

घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाचे अध्यक्ष तानाजी भोसले यांनी सहकाऱ्यांसह तातडीने गडावर धाव घेतली. रात्रीच्या वेळी अत्यंत अवघड आणि खोल दरीत उतरून पथकाने शोध मोहीम राबवली आणि मृतदेह बाहेर काढला. या मोहिमेत गणेश सपकाळ, संदीप साळसकर, संजय चोरगे व नाना अवसरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.बचाव मोहिमेनंतर मृतदेह राजगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. यावेळी पोलीस हवालदार राजेंद्र गव्हाणे व पोलीस कर्मचारी पवार घटनास्थळी उपस्थित होते. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू केली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी भोर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. धोत्रे यांचा मृत्यू अपघाती आहे की अन्य काही कारण, याचा तपास पोलीस करत असून शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमकेकारण स्पष्ट होईल.

# पुणे-सोलापूर महामार्गावरील दुभाजक फोडल्याने जीव धोक्यात

## सहजपूर परिसरात अपघातांचा धोका वाढला ; प्रशासनाच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २६ : पुणे-सोलापूर महामार्गवरील सहजपूर (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीत अज्ञात व्यक्तींनी रस्ता दुभाजक फोडल्याची गंभीर बाब समोर आली आहे. पांगारकर वस्ती, म्हेत्रे पॅकेजिंग, थोरात वस्ती तसेच हॉटेल मल्हार समोर आणि कॅनॉलजवळील भागात दुभाजक ते फुटांपर्यंत तोडण्यात आल्याने हा मार्ग सध्या अत्यंत धोकादायक बनला आहे.

उरुळी कांचन ते कासुर्डी जुन्या टोलनाक्यापर्यंत अनेक ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी असलेले



दुभाजक नागरिकांनी स्वतःच्या सोयीसाठी फोडल्याचे धक्कादायक वास्तव दिसून येत आहे. काही ठिकाणी दुचाकींसाठी तर काही ठिकाणी चारचाकी वाहनांसाठी मुद्दाम मार्ग तयार करण्यात आले आहेत. या फोडलेल्या दुभाजकांम धून वाहनचालक अचानक रस्ता ओलांडत असल्याने दोन्ही बाजूंनी वेगाने येणाऱ्या वाहनांना तात्काळ ब्रेकलावावेलागतआहेत.परिणामी, वारंवार वाहतूक कोंडी होत असून अपघातांचा धोका वाढला आहे. विशेषतः सायंकाळच्या गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे.

राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. दुभाजक फोडून तयार केलेले बेकायदेशीर कट तातडीने बंद करण्यात यावेत, दुभाजकाची उंची वाढवावी, तसेच तेथे साचलेली म ाती हटवून पूर्वस्थिती बहाल करावी, अशी मागणी नागरिक व प्रवासी करत आहेत.

दरम्यान, संबंधित महामार्ग प्रशासन व अधिकाऱ्यांनी या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण? असा संतप्त सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. महाम ार्गावरील सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना होणार का, याकडे सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालकांचे लक्ष लागले आहे.

# बारामती येथील महिलेवर लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीला १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा

**बारामती, ता. २६ :** बारामती शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात पीडित निर्भया हिला न्याय मिळवून देण्यात बारामती पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वेगवान तपास, पुराव्यांची शिस्तबद्ध मांडणी आणि न्यायालयीन प्रक्रियेत प्रभावी पाठपुरावा यामुळे आरोपीला अखेर १० वर्षांची सश्रम शिक्षा ठोठावण्यात आली. आण्णा सुरेश ओव्हाळ (वय ४३, रा. सरडे, ता. फलटण, जि. सातारा) असे १० वर्षे सश्रम करावासाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जून २०२४ रोजी आरोपी आण्णा सुरेश ओव्हाळ याने पीडितेवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. पीडित महिलेने धैर्याने पुढे येत तक्रार नोंदवली आणि त्यानुसार गुन्हा भा.द.वि. कलम ३७६(२)(r) अन्वये तत्काळ दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक संध्याराणी देशमुख यांनी तपासाची सूत्रे हातात घेत साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल आणि तांत्रिक बाबींचे भक्कम संकलन करून आरोपीविरुद्ध ठोस व विश्वासार्ह पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले.

सदर प्रकरणाची सुनावणी मा. बी. डी. शेळके (जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती) यांच्या न्यायालयात (सेशन केस नं. १६३/२०२४) झाली असता, न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत भा.द.वि. कलम ३७६(२)(F)



अंतर्गत १० वर्षे सश्रम कारावास व रुपये २० हजार दंड अशी कठोर शिक्षा सुनावली. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता कमलाकर एस. नवले यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड आणि प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सेशन कोर्ट पैरवी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक कसपटे, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे (TMC, पुणे ग्रामीण) तसेच कोर्ट कर्मचारी आवटे व कोकरे यांनीही मोलाची भूमिका बजावली.

दरम्यान, बारामती शहर पोलिसांनी ठाम संदेश देत महिलांवरील अत्याचार सहन केला जाणार नाही. गुन्हेगारांना कठोर शिक्षा होईल व महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत बारामती पोलीसांची Zero Tolerance भूमिका कायम राहील असा महत्वपूर्ण संदेश दिला आहे.

# देशात साखर उत्पादनात महाराष्ट्राचा पहिला नंबर; उत्तर प्रदेश आणि कर्नाटक पिछाडीवर

**पुणे, ता. २६ :** देशात साखर उत्पादनात उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्र चालू हंगामात पहिला क्रमांक पटकावणार आहे. या हंगामात देशातील एकूण साखर उत्पादन ३२४ लाख टन असेल आणि त्यात महाराष्ट्राचा वाटा ११८ लाख टन तर उत्तर प्रदेशचा वाटा ९८.५ लाख टन असेल, असा अंदाज इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (इस्मा) बुधवारी वर्तविला.

इस्माच्या कार्यकारी समितीची बैठक पुण्यात झाली. या बैठकीनंतर देशातील साखर उत्पादनाचा चालू हंगामातील तिसरा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला. या महिन्याच्या सुरुवातीला उपग्रहांद्वारे घेतलेल्या छायाचित्रांचे मूल्यमापन करून हा अंदाज मांडण्यात आला आहे. त्यात आतापर्यंत तोडणी झालेल्या उसाचे क्षेत्र, तोडणी राहिलेले क्षेत्र यांचा विचार करण्यात आला आहे. तसेच, उसाचे उत्पादन, साखरेचा उतारा या गोष्टींचाही विचार यात करण्यात आला आहे.

इस्माच्या अंदाजानुसार, देशात या हंगामात साखर उत्पादन ३२४ लाख टन राहील. त्यातील ३१ लाख टन साखर इथेनॉल उत्पादनासाठी वळविण्यात येईल. यामुळे निव्वळ साखर उत्पादन २९३लाख टन असेल. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पादन १२ टक्के जास्त असेल. आधीच्या अंदाजात देशात साखर उत्पादनात उत्तर प्रदेश आघाडीवर राहील, असे चित्र मांडण्यात आले होते. नवीन अंदाजात उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्र प्रथम स्थानी पोहोचला आहे. महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादन ११८ लाख टन असेल. गेल्या हंगामात ते ९३.५१ लाख टन होते. उत्तर प्रदेशचे साखर उत्पादन ९८.५ लाख टन अपेक्षित असून, ते गेल्या हंगामात १०१.१६ लाख टन होते. कर्नाटकचे साखर उत्पादन ६१.०४ लाख टन राहण्याचा अंदाज असून, ते गेल्या हंगामात ५४.८८ लाख टन होते.

चालू हंगामात महाराष्ट्र आणि कर्नाटकामध्ये उसाचे उत्पादन कमी झाले असून, साखरेचा उतारा वाढला आहे. उसाचे उत्पादन कमी होण्यामागे उसाला मोठ्या प्रमाणात फुटलेले तुरे कारणीभूत ठरले आहेत. जास्त पाऊस झाल्याने ऊस परिपक्व होण्याचा कालावधी कमी होऊन उत्पादकतेत घट झाली. याचबरोबर कारखान्यांकडून गाळप जास्त झाल्यानेही ऊसतोडणी लवकर झाल्याचाही परिणाम उसाच्या उत्पादकतेवर झाला, असे इस्माने नमूद केले आहे.

### अतिरिक्त साठा ५३ लाख टन

चालू हंगाम सुरू होताना ऑक्टोबर २०२५ मध्ये देशातील साखरेचा अतिरिक्त साठा ५० लाख टन होता. यंदाच्या हंगामात उत्पादन, इथेनॉल निर्मितीसाठी वळविण्यात येणारे उत्पादन आणि शिल्लक धरून देशातील साखरेचा एकूण साठा ३४३ टन होणार आहे. देशांतर्गत साखरेची मागणी २८३ लाख टन असून,७ लाख टन साखरेची निर्यात होणार आहे. त्यामुळे चालू हंगाम संपताना सप्टेंबरअखेरीस साखरेचा अतिरिक्त साठा ५३ लाख टन असेल, असे इस्माने म्हटले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## पपईचा वापर केसांसाठी केल्याने काय परिणाम होतात, जाणून घ्या

पपईचे आपल्या आहाराच्या दृष्टीनेही अनेक फायदे आहेत. तसेच पपई मास्क आपण त्वचेवर सुद्धा लावू शकतो. पपईपासून आपण केवळ फेस पॅक बनवू शकत नाही तर त्यामधून केसांचा मास्क सुद्धा बनवता येईल. पपई हेअर मास्कमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. कोरड्या निर्जीव केसांसाठी हे खूपच फायदेशीर आहे.

अलीकडे तरुण वयोगटातील मुलींमध्ये केसगळतीचे प्रमाण खूपच वाढताना दिसत आहे. नवनवीन हेअर स्टाइल करून तसेच रासायनिक प्रक्रियेमुळे तरुणींमध्ये केसगळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

पपईचे आरोग्यासाठी बरेच फायदे आहेत. हे आपल्या त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन ए आणि सी समृद्ध आहे. ते पौष्टिक फायद्यासाठी ओळखले जातात. आपण पपईपासून फेस पॅकच तयार करू शकत नाही तर त्यापासून केसांसाठी मास्क सुद्धा तयार करू शकतो. पपई हेअर मास्कमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. कोरड्या निर्जीव केसांसाठी हे फायदेशीर आहे.

पपईचे काही ताजे तुकडे ब्लेंडरमध्ये ठेवा आणि पपईचा लगदा तयार करा. एका भांड्यात २ चमचे पपईचा लगदा घ्या आणि त्यात समान प्रमाणात नारळ तेल मिसळा. यासह आपल्या केसांवर लावावे, आणि चांगली मालिश करावी. पपईच्या केसांचा मास्क सुमारे एक तासासाठी तसेच ठेवावे. त्यानंतर सौम्य शैम्पूने केस धुवावे. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा लावावा.

पपईचे आरोग्यासाठी बरेच फायदे आहेत. हे आपल्या त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन ए आणि सी समृद्ध आहे. ते पौष्टिक फायद्यासाठी ओळखले जातात. आपण पपईपासून फेस पॅकच तयार करू शकत नाही तर त्यापासून केसांसाठी मास्क सुद्धा तयार करू शकतो. पपई हेअर मास्कमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. कोरड्या निर्जीव केसांसाठी हे फायदेशीर आहे.

पपईचे काही ताजे तुकडे ब्लेंडरमध्ये ठेवा आणि पपईचा लगदा तयार करा. एका भांड्यात २ चमचे पपईचा लगदा घ्या आणि त्यात समान प्रमाणात नारळ तेल मिसळा. यासह आपल्या केसांवर लावावे, आणि चांगली मालिश करावी. पपईच्या केसांचा मास्क सुमारे एक तासासाठी तसेच ठेवावे. त्यानंतर सौम्य शैम्पूने केस धुवावे. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा लावावा.

# कुंजीरवाडी यात्रेत चोरट्यांचा उच्छाद

## ८ पेक्षा जास्त नागरिकांच्या सुमारे १० तोळ्यांहून अधिक दागिन्यांवर मारला डल्ला

**लोणी काळभोर, ता. २६ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील ग्रामदैवत कालभैरवनाथ यात्रेत बुधवारी (ता. २५) रात्री चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत महिला, लहान मुले व तरुणांच्या गळ्यातील चैन अशा अंदाजे ८ पेक्षा जास्त नागरिकांच्या सुमारे १० तोळ्यांहून अधिक सोन्या-चांदीच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून लोणी काळभोर पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत.




यात्रेनिमित्त पंचक्रोशीतील हजारो भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण, पर्स, लहान मुलांच्या गळ्यातील सोन्याचे बदाम व कानातले, तसेच तरुणांच्या गळ्यातील सोनसाखळ्या क्षणार्धात लंपास केल्या. काही महिलांना दागिने चोरीला गेल्याचे समजताच त्यांना धक्का बसला, तर काहींनी रडारड करत घटनास्थळीच संताप व्यक्त केला.

विशेष म्हणजे, यापूर्वीही कुंजीरवाडीतील काही मंगल कार्यालयांमध्ये चोरीच्या घटना घडल्या होत्या. तरीदेखील यात्रेसारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त न ठेवणे ही गंभीर बाब मानली जात आहे. ग्रामपंचायतीने यात्रेबाबतची पूर्वसूचना लोणी काळभोर पोलिसांना दिली होती, असे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात प्रभावी बंदोबस्त दिसून आला नाही, अशी नागरिकांमध्ये जोरदार चर्चा आहे.

> कुंजीरवाडी येथील यात्रेदरम्यान पोलिसांचा आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गर्दीत काही चोरट्यांनी दागिने चोरी केल्याची माहिती मिळत आहे. मात्र, अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीही अधिकृत तक्रार पोलीस ठाण्यात दाखल झालेली नाही. तक्रार प्राप्त झाल्यानंतर गुन्हा नोंदवून संबंधित चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
> - **राजेंद्र पन्हाळे,** (वरिष्ठ पोलीस निरीक्षक - लोणी काळभोर पोलीस ठाणे)

कुंजीरवाडीचे सरपंच हरेश गोठे यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले, ग्रामपंचायतीने सर्व तयारी केली होती. यात्रेची माहितीही पोलिसांना देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात बंदोबस्त नव्हता. काही पोलीस येत-जात होते, पण गर्दीत थांबून नियंत्रण ठेवण्याचे काम झाले नाही. पोलीस ठाण मांडून उभे राहिले असते, तर इतक्या मोठ्या प्रमाणात चोऱ्या झाल्या नसत्या.

यात्रेत ज्यांचे दागिने चोरीला गेले आहेत, त्या सर्वांना एकत्र घेऊन आज दुपारी तीनच्या सुमारास लोणी काळभोर पोलीस ठाण्यात जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यात्रेत महिलांपासून लहान मुलांपर्यंत सर्वांनाच लक्ष्य करण्यात आल्याने ही टोळी सराईत असून नियोजनबद्ध पद्धतीने चोऱ्या करण्यात आल्या असाव्यात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडे संबंधित चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे सरपंच गोठे यांनी सांगितले.

दरम्यान, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून वारंवार घडणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. यात्रेसारख्या धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमातच जर नागरिक असुरक्षित असतील, तर सामान्य दिवसांत काय परिस्थिती असेल, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

## उरुळी कांचन येथे दोन ठिकाणी घरफोडी

**उरुळी कांचन, ता. २६ :** पुणे -सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीत शेजारी शेजारी असलेल्या दोन घरी चोरी झाल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील पांढरस्थळ हद्दीत गुरुवारी (ता. २६) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे. दरोडेखोर सीसीटीव्हीत कैद झाले असून या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

आशिष अनिल लोंढे, व सौरभ अविनाश गायकवाड (रा. दोघेही, पांढरस्थळ, उरुळी कांचन, ता. हवेली) असे घरी चोरी झालेल्या घरमालकांची नावे आहेत.

या घटनेत आशिष लोंढे यांच्या घरातून १० हजार रुपये रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केली आहे तर सौरभ गायकवाड यांच्या घरात चोरट्यांना काहीच मिळाले नाही.

# सविंदणेत क्रीडा शिक्षकाला मारहाण; विद्यार्थ्यांचा ठिय्या आंदोलनातून संताप व्यक्त

**शिरूर, ता. २६ :** सविंदणे (ता. शिरूर) येथील क्रीडा शिक्षक नितीन चव्हाण यांचे मंगळवारी (ता. २४) रात्री अपहरण करून भरचौकात बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने घरात घुसून त्यांना जबरदस्तीने उचलून नेल्याने गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी पोलिसांकडून गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाने वेगळे वळण घेतले असल्याचे बोलले जात आहे.



स्थानिक ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चव्हाण हे सायंकाळी घरी विश्रांती घेत असताना अचानक काही जणांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. संबंधितांनी चव्हाण यांना जबरदस्तीने बाहेर खेचत नेले. काही वेळानंतर टोळक्याने चव्हाण यांना गावातील मुख्य चौकात आणून लाथाबुक्क्यांनी तसेच काठ्या-दांडक्यांनी बेदम मारहाणही केली. यावेळी काहींच्या हातात कोयते असल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. दरम्यान,या घटनेच्या निषेधार्थ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी बुधवारी सकाळी ठिय्या आंदोलन छेडले. आमच्या शिक्षकांना न्याय मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा ठाम इशारा विद्यार्थ्यांनी दिला. आमच्या शिक्षकांना न्याय द्या अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी फलक हातात घेत निषेध व्यक्त केला. पालकांचाही आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले.त्यानंतर पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांशी संवाद साधत घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी मागणी उपस्थित आंदोलकांनी केली. सुमारे चार तास चाललेल्या आंदोलनानंतर पोलिसांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

दरम्यान, रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेमुळे सविंदणे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून,शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या गंभीर घटनेचा पोलिसांकडून पुढील अधिक तपास सुरू आहे.

# कासुर्डीत गावठी पिस्टलसह तरुण जेरबंद

## जिवंत काडतूसासह १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २६ : यवत पोलिस स्टेशन हद्दीतील कासुर्डी येथे गावठी पिस्टल व जिवंत काडतूस बाळगल्याप्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई बुधवारी (ता. २५) सायंकाळी सव्वा पाच वाजता भरतगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर, पिराच्या मंदिराजवळ करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिरोज कचरु सय्यद (वय ३०, रा. कासुर्डी, ता. दौंड, जि. पुणे) हा विना परवाना गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस बाळगत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. झडतीदरम्यान त्याच्याकडून



सुमारे १५ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलिस हवालदार गुरुनाथ गायकवाड यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बेकायदा हत्यार बाळगल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला तात्काळ अटक केली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मोरे करीत आहेत.

# सर्वोच्च न्यायालयाने वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला

**दिल्ली, ता. २६ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळत प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांच्या समोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने स्पष्ट केले की, सध्या जामीन देण्यास योग्य परिस्थिती नाही. मात्र, खटल्याची सुनावणी दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यास वर्षभरानंतर पुन्हा जामिनासाठी अर्ज करता येईल, अशी शक्यता खुली ठेवण्यात आली आहे.



यापूर्वी बॉम्बे उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ तसेच बीड जिल्हा न्यायालयानेही कराडचा जामीन व दोषमुक्ती अर्ज फेटाळला होता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या प्रकरणात अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. सुनावणीपूर्वी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कॅव्हेट दाखल करून कुटुंबाची बाजू मांडण्याची तयारी दर्शवली होती. ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. पोलिसांच्या आरोपपत्रानुसार खंडणीच्या वादातून हा खून झाल्याचा उल्लेख आहे. या प्रकरणात खंडणी, अ‍ॅट्रॉसिटी आणि हत्या या तिन्ही गंभीर कलमांखाली तपास सुरू आहे. दरम्यान, तपासादरम्यान अनेक आरोपींना अटक झाली असली तरी कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे. तो गावी तीन वेळा येऊन गेला, असा दावा धनंजय देशमुख यांनी केला असून कुटुंबाला धोका असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

# १२ झेडपी, १२५ पंचायत समितीच्या अध्यक्ष–सभापती निवडीचा मुहूर्त ठरला

**मुंबई, ता. २६ :** राज्यातील १२ जिल्हा परिषदां व त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आता अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती आणि उपसभापती पदांच्या निवडीची प्रक्रिया सुरू होणार आहे. यासाठी संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना २० मार्च २०२६ पूर्वी पहिल्या बैठका आयोजित करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाने दिले आहेत.




राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणुका पार पडल्या असून, महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ११(१) आणि ५९(१) नुसार नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ हा पहिल्या बैठकीपासून सुरू होतो. त्यामुळे नियमानुसार पहिली बैठक वेळेत घेणे आवश्यक असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर आणि परभणी या जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच संबंधित विभागीय आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाही आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या बैठकीत अध्यक्ष व सभापती पदांच्या निवडीची औपचारिक प्रक्रिया पार पडणार असून, त्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ अधिकृतपणे सुरू होणार आहे.

# काळेवाडीत अडीच लाखांचा गांजा जप्त; तिघे अटकेत

**पिंपरी-चिंचवड, ता. २६ :** पिंपरी-चिंचवड पोलीस गुन्हे शाखा युनिट-२ ने काळेवाडी परिसरात अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत तीन तरुणांना अटक केली आहे. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास रागा हॉटेलसमोर, हॉटेल पाटीलवाड्याकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर ही धाड टाकण्यात आली.

या कारवाईत आरोपींकडून १३ ग्रॅम गांजा आणि २६.७० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा असा एकूण सुमारे २ लाख ६५ हजार ३५० रुपयांचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. प्रकरणी NDPS Act अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक राकेश खेरनार (२७, रा. हिंजवडी), मयूर घनश्याम कपाटे (२५, रा. अशोकनगर, पिंपरी) आणि अक्षय विजय मंथान ( रा. पिंपरीगाव) यांना अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी प्रतीक राकेश खेरनार (२७, रा. हिंजवडी), मयूर घनश्याम कपाटे (२५, रा. अशोकनगर, पिंपरी) आणि अक्षय विजय मंथान (२८, रा. पिंपरीगाव) यांना अटक करण्यात आली आहे.पोलिस तपासानुसार, आरोपी क्रमांक १ कडून १३ ग्रॅम गांजा (किंमत अंदाजे ६,४५० रुपये), आरोपी क्रमांक २ कडून ३.३० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा (किंमत ३० हजार ३०० रुपये) आणि आरोपी क्रमांक ३ कडून २३.४० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा २ लाख ३० हजार ४०० रुपये जप्त करण्यात आला.

दरम्यान, पोलिसांनी पुरवठा साखळीचा तपास सुरू केला असून या प्रकरणात आणखी काही जणांना अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमली पदार्थांविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# अजितदादांचा मृत्यू अपघात नव्हे, सदोष मनुष्यवध; संजय राऊतांचा आरोप

**मुंबई, ता. २६ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेच्या तपासावरून राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत सरकारवर जोरदार टीका करत या प्रकरणाला अपघात नव्हे तर सदोष मनुष्यवध म्हटले. आमदार रोहित पवार यांनी मांडलेले तांत्रिक मुद्दे अभ्यासपूर्ण आणि गंभीर असल्याचे सांगत त्यांनी डीजीसीएपासून ते तडठ व्हेंचर्सपर्यंत अनेक बाबींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



राऊत म्हणाले की, रोहित पवार मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात जाऊन डीजीसीए आणि VSR कंपनीविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत होते. मात्र ती मागणी फेटाळण्यात आली. राज्याच्या उपमुख्यमंत्र्याच्या जवळच्या नातेवाईकाची तक्रार नोंदवली जात नाही आणि वरून फोन येतात, हा काय प्रकार आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सरकारचे दु:ख खरे आहे का, असा खोचक प्रश्नही त्यांनी विचारला.

राऊत यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू आणि VSR कंपनीच्या मालकांमध्ये आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप केला. कंपनीमध्ये काही राजकीय व्यक्तींची गुंतवणूक असल्याचा दावा करत तपासावर संशय व्यक्त केला. बारामतीतील विमान दुर्घटनेत काहीतरी दडपले जात आहे, असेही ते म्हणाले. दरम्यान, राष्ट्रवादीतील एकत्रीकरणाबाबत बोलताना राऊत यांनी दोन्ही राष्ट्रवादी गट पुन्हा एकत्र येण्याची प्रक्रिया संपल्याचे सांगितले. शरद पवार राज्यसभा निवडणूक लढवतील आणि महाविकास आघाडी एकत्रित निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विमान दुर्घटनेच्या चौकशीवरून सुरू असलेल्या या आरोप-प्रत्यारोपांमुळे तपासाच्या पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आता अधिकृत अहवाल आणि पुढील कायदेशीर कारवाईकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# चोरीच्या आरोपाने तरुण नैराश्यात; धावत्या रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या

## संचालक आणि एचओडीवर गुन्हा दाखल

**फुरसुंगी, ता. २६ :** पुण्यातील एका नामांकित बॅन्केट-रिसोर्टमध्ये काम करणाऱ्या २२ वर्षीय तरुणाने मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून रेल्वेखाली आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. ही घटना सासवड रोड रेल्वे स्टेशनजवळ, लिटल फ्लॉवर शाळेजवळील रेल्वे पटरीवर २३ फेब्रुवारीला घडली आहे. या प्रकरणी हॉटेलच्या प्रॉपर्टी डायरेक्टरसह एचओडीविरुद्ध फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल लक्ष्मण अहिरे (वय २२, मूळ रा. शिंडादा, ता. पाचोरा, जि. जळगाव) असे आत्महत्या केलेल्या कामगाराचे नाव आहे. तर प्रॉपर्टी डायरेक्टर तरुण साचवाणी व एचओडी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५ (२), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अतुलचा भाऊ स्वप्निल अहिरे (रा. फुरसुंगी) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अतुल अहिरे हा मागील सहा महिन्यांपासून रावेत परिसरातील प्राणा बॅन्क्वेट अ‍ॅन्ड रिसोर्ट येथे नोकरीला होता. त्याची राहण्याची व्यवस्था गहुंजे येथे करण्यात आली होती. अतुलचा मोठा भाऊ स्वप्निल अहिरे याने फुरसुंगी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. माझ्या भावाला पगार वेळेवर दिला



जात नव्हता. तो वारंवार त्रास होत असल्याचे सांगत होता. त्याने राजीनामा दिला तरी तो स्वीकारला गेला नाही. उलट त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप ठेवून मारहाण करण्यात आली, असा थेट आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अतुलच्या मोबाईलमध्ये सापडलेल्या मेसेजमध्ये धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. हेड ऑफिसमध्ये बोलावून मला मारहाण केली. चोरी केली असे जबरदस्तीने कबूल करायला लावले. रूम टॅरिफमधून १०००-२००० रुपये घेतल्याचा खोटा आरोप केला. शिवीगाळ व बदनामी केली. हा अपमान सहन न झाल्याने मी जीव देत आहे, असा मजकूर त्या मेसेजमध्ये असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, घटनेच्या आदल्या दिवशी अतुलने भावाला मला खूप त्रास आहे, सगळं सांगायला तुझ्याकडे येतो असे फोनवर सांगितले होते. मात्र २३ फेब्रुवारीच्या रात्री साडेअकरा वाजता फोन केल्यावर पोलिसांनी रेल्वे अपघात झाल्याची माहिती दिली. ससून रुग्णालयात नेल्यानंतर अतुलला मृत घोषित करण्यात आले. पुढील तपास फुरसुंगी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नानासाहेब जाधव करीत आहेत.

### व्यवस्थापनाची दादागिरी की व्यवस्थेचा बळी?

कामगारांवर दबाव टाकणे, राजीनामा नाकारणे, खोटे आरोप करून मारहाण करणे, हे सर्व आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. जर हे आरोप खरे ठरले, तर हा प्रकार केवळ आत्महत्येचा नसून व्यवस्थापनाच्या कथित छळाचा बळी ठरलेल्या तरुणाचा आहे, अशी चर्चा सुरू आहे. या घटनेमुळे हॉटेल उद्योगातील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.